# पती, पत्नी और वो!



**डॉ. किशोर अतनूरकर**
atnurkarkishore@gmail.com

साल १९७८ मध्ये 'पती, पत्नी और वो' हा बी. आर. चोप्रा दिग्दर्शित हिंदी सिनेमा प्रदर्शित झाला. या सिनेमाच्या नावातच एक वेगळेपण आहे. सिनेमा कसा असेल याबद्दलची उत्सुकता असल्यामुळे अनेकांनी हा सिनेमा पाहिला. पती–पत्नीच्या संसारात जेव्हा 'वो' च्या रूपात एखाद्या स्त्रीची एन्ट्री होते; तेव्हा सुरळीत चालू असलेल्या संसाराची 'वाट' लागू शकते म्हणून त्या 'वाटेवर' न जाणेच बरे, असा संदेश देणारे चित्रपटाचे कथानक. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, या सिनेमात 'विवाहबाह्य संबंध' हा विषय हाताळला गेला आहे. त्याच सुमारास (साल १९८१) या विषयावर अजून एक चित्रपट आला. अमिताभ बच्चन, जया भादुरी आणि रेखा यांचा 'सिलसिला.' अमिताभ आणि जया यांच्या संसारात रेखा येण्याच्या सत्यघटनेशी हा सिनेमा संबंधित असल्याचीही चर्चा होती. हे झाले सिनेमाबद्दल.

वास्तविक जीवनात एखाद्या विवाहित पुरुषाचे (किंवा स्त्रीचे) विवाहबाह्य संबंध आहेत किंवा नाहीत हा लोकांसाठी चर्चेचा विषय. विवाहबाह्य संबंध ठेवणे हा तसा त्याचा किंवा तिचा 'प्रायव्हेट मामला' आहे, एक खाजगी बाब. बऱ्याचदा ते 'गुपचूप' पद्धतीने ठेवले जातात; कुणाला माहितीही होत नाही. जेव्हा ही बातमी लोकांना माहिती होते किंवा 'बातमी फुटते', तेव्हा लोकांसाठी ती चर्चा असते.

## गॉसिप आणि सहानुभूती

''तुम्हाला माहिती आहे का नाही? अमुक माणूस बाहेरख्याली आहे त्याचे अमुक महिलेशी (शारीरिक) संबंध आहेत असं ऐकलंय! वाटलं नव्हतं हो असं काही असेल म्हणून! नसेल हो, तुम्हाला कुणी सांगितलं? लोक काहीपण म्हणतात नाही, त्याला आणि तिला लोकांनी एकत्र सिनेमागृहात पाहिलं म्हणे''अशाप्रकारे 'गॉसिपिंग' केलं जातं. सर्वसाधारणपणे या गप्पांचा शेवट - ''जाऊ दे, आपल्याला काय करायचं पण त्याच्या पत्नीबद्दल वाईट वाटतं. तिला हे माहिती आहे का नाही कोण जाणे! माहिती झालं तरी ती काय करणार बिचारी! लोकलज्जेस्तव शांत बसण्याशिवाय पर्याय नाही.''अशा अर्थाच्या वाक्यांनी होतो. विवाहबाह्य संबंध हा लोकांसाठी गप्पा मारतानाचा आवडीचा विषय असतो, यात शंका नाही.

## अपराधीपणाचे ओझे

विवाहबाह्य संबंधांचे समर्थन होऊ शकत नाही. आजही कोणत्याही जाती-धर्मात विवाह होत असताना पती-पत्नी एकमेकांशी आयुष्यभर एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करतात. असं असलं तरी वैवाहिक जीवन जगताना काही पती अथवा पत्नींच्या आयुष्यात असे प्रसंग येतात. विवाहबाह्य शारीरिक संबंध ठेवणं ही त्या क्षणापुरती दोघांनाही आनंद देणारी बाब असली तरी, त्या प्रसंगानंतर ''आपण काहीतरी अपराध केला आहे''असे वाटणे स्वाभाविक. ही अपराधी भावना स्त्रियांमध्ये पुरुषांच्या तुलनेत अधिक असते. त्याचप्रमाणे त्या 'अपराधा'बद्दल भोगावी लागणारी शारीरिक आणि भावनिक शिक्षा स्त्रियांना अधिक भोगावी लागते, कारण या संबंधातून गर्भधारणेची शक्यता स्त्रियांच्या शरीराशी जोडलेली आहे. पुरुष 'काम' करून नामानिराळे होऊ शकतात; स्त्रिया तसे सहज होऊ शकत नाहीत.

पूर्वीच्या काळात, जेव्हा गर्भप्रतिबंधक साधनं आणि वैद्यकीय गर्भपाताच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्या काळात विवाहबाह्य संबंधातून होणारी गर्भधारणा हाताळणे सर्वच दृष्टीने नाजूक बाब होती. आज लोक जागरूक झाले आहेत. त्या प्रसंगी गर्भनिरोधक साधनांचा वापर केला जातो किंवा नंतर गर्भधारणा थांबविण्यासाठी औषधे घेतली जातात. त्यामुळे विवाहबाह्य संबंध ठेवणे हे स्त्रीसाठी तुलनेने 'सेफ' झाले आहे. अर्थात, ज्या स्त्रिया स्वभावाने अतिशय संवेदनशील आहेत, त्या भावनिक त्रास टाळू शकत नाहीत.

## कारणांचा अंधार

वास्तविक पाहता, स्त्री-पुरुष विवाहबाह्य संबंधांकडे का आकर्षित होतात? याची कारणमीमांसा करणं म्हणजे अंधारात बाण मारण्यासारखं आहे. हा विषय जाणून घेण्यासाठी त्यांची मुलाखत घेणेच गरजेचे. किती स्त्रिया किंवा पुरुष विवाहबाह्य संबंध ठेवतात याची आकडेवारी उपलब्ध नाही. तीव्रता किंवा व्यापकता आकडेवारीवरून सांगता येत नाही. पण परिणामांविषयी मात्र बोलता येते. लैंगिक समाधान ही मानवाची

मूलभूत गरज आहे. लग्नापूर्वी आणि लग्नानंतर असे संबंध समाजात पूर्वीही होते, आजही आहेत आणि उद्याही थांबणार नाहीत. लग्नानंतर बहुतेक जोडपी पती-पत्नीतील प्रामाणिकपणा हा नियम पाळत असतात.

## लैंगिक असमाधान

पती-पत्नीचे लैंगिक जीवन समाधानकारक नसेल, तर दोनच गोष्टी घडू शकतात -

१. जे आहे तेच चालू देत ॲडजेस्टमेंट करणे
२. किंवा असमाधानामुळे 'वो'च्या दिशेने ओढा वाढणे

पूर्वी घरातच मर्यादित असलेली स्त्री आज शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्ताने बाहेर पडली आहे. पुरुषांसोबत काम करण्याच्या संधी वाढल्या आहेत. त्यामुळे विवाहबाह्य संबंधांची शक्यता पूर्वीपेक्षा वाढली आहे. स्त्री पुरुषांमधील नैसर्गिक आकर्षण कधी कधी इतके प्रबळ असते की त्या क्षणी विवाहातील शपथ आठवत नाही. अपराधी-पणाची भावना काहींच्या मनात राहते, काहींच्या मनात राहत नाही. काही वेळा हा बाहेरख्यालीपणा वाढीस लागतो आणि त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. ''ही गोष्ट श्रीमंतांत, राजकारणात, ग्रामीण-अशिक्षित लोकांत जास्त असते' असा समजही प्रचलित आहे. काही स्त्रिया राजकीय पदासाठी विवाहबाह्य संबंधांचा 'हत्यार' म्हणून वापर करतात अशीही चर्चा असते.

समाजात कुणीही उघडपणे विवाहबाह्य संबंधांचं समर्थन करत नाही. अनुभव घेतल्यानंतरही लोक याला विरोधच करतात. घरात रोज चांगलं, रुचकर जेवण मिळत असेल तर बाहेर जेवायला जाण्याचं कारण नसतं. तरीही काही लोक 'चेंज' म्हणून बाहेर खातात. तसंच घरात काहीतरी सबळ कारण असलं तरच, एखादा विवाहबाह्य संबंध ठेवेल, असेही लोक म्हणतात.



आज तरुण मुली आणि विवाहित स्त्रियांमध्ये दारू पिणे, धूम्रपान करणे वाढले आहे. एकदा अपराधीपणाची भावना कमी झाली की हे वर्तन अंगवळणी पडू शकतं. खूप स्त्रियांना आपला नवरा बाहेरख्याली आहे, हे माहिती असते. परंतु त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसल्यास त्यांना हे सहन करून जगण्याशिवाय पर्याय नसतो. सुशिक्षित आणि स्वावलंबी बायका देखील लोकलज्जेस्तव हा प्रकार सहन करतात.

### समाजातील गैरसमज

'पुरुष नैसर्गिकरीत्या पॉलीगॅमस असतात' हे विधान पूर्णपणे खरे नाही. पुरुषाची इच्छा पूर्ण होण्यासाठी स्त्रीचा सहभाग आवश्यक आहे. तिचा 'होकार' नसल्यास असं काही घडत नाही. स्त्री आणि पुरुष दोन्ही अल्पप्रमाणात पॉलीगॅमस वृत्तीचे असतात. फक्त काही पुरुष किंवा स्त्रियांना अशी संधी मिळते, एवढंच.

विवाहबाह्य संबंधांचे जोखीम आणि दुष्परिणाम गंभीर असतात. जसे की; एड्स किंवा लैंगिक आजार, पत्नी किंवा पतीपर्यंत आजार पोचण्याचा धोका, आर्थिक नुकसान, दोन घरांचा खर्च, भांडणं, मानसिक त्रास, मुलांच्या मनावर परिणाम, नाव-प्रतिष्ठेची हानी, घटस्फोट, आत्महत्येची शक्यता इत्यादी. अल्पकाळ आनंदासाठी दीर्घकालीन क्लेशदायक परिणाम पत्करावे लागतात. शेवटी हा वैयक्तिक निर्णय असतो, पण अत्यंत सावधगिरीने घ्यावा लागतो.

**(लेखक : M.D. (स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र), Ph.D. (समाजशास्त्र), M.S. (काउन्सिलिंग आणि सायकोथेरपी) असून, 'स्त्री आरोग्य अभ्यासक' म्हणून नांदेडमधील नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे. 'निर्णय तुझा माझा', 'तिच्या आरोग्यासाठी सर्व काही', 'अपत्य जन्माचे समाजभान' अशा लोकप्रिय पुस्तकांचे लेखक आहेत.)**

